१७ जानेवारी २०१२

# कम्युनिझमच्या जाचातून सुटलेल्यांची गोष्ट

सुमारे २२ वर्षांपुर्वी सोव्हीएत युनियनचे विघटन होऊन १३ स्वतंत्र देशांची निर्मिती झाली. या पैकी एका छायासेखकाची कथा सादर करण्यात आला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक स्वेटोस्लॅव ऑवट्चॅरो यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

सोव्हिएन युनियनचे विघटन झाल्यावर अनेक व्यक्तींवर भावनिक आणि कौटुंबिक स्वरुपाचा प्रभाव पडला. कम्युनिझमधून लोकशाही देशात बल्गेरियाचे रुपांतर झाले. तात्पूर्वी हा छायालेखक सोव्हिएत युनियनमध्ये होतो. त्याची एक प्रेयसी होती. ती विघटनानंतर जर्मनीमध्ये गेली. परिणामी दोघांनाही आपले भावनिक जीवन जगताना ज्या समस्या आल्या त्याची ही कथा. प्रेयसी आणि व्यवसाय या एकाची निवड करताना जो भावनिक संघर्ष होतो तो आणि दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या चित्रपटात दाखविल्या आहेत. दिग्दर्शक स्तेहोस्तॅव यांनी सांगितले की बल्गेरियात दरसाल फक्त दहा चित्रपट तयार होतात. यापुढेही परिस्थिती फारशी चांगली सेल असे वाटत नाही. तीन- चार वर्षांनी काही चांगले घडू शकेल.

हा चित्रपट तयार करताना अनंत समस्या आल्या. काहींना हा चित्रपट होऊच नये असे वाटत होते. चित्रपटासाठी पैसे जमवणे अत्यंत कठीण असते. त्यातून धडपड करुन हा चित्रपट तयार केला. काही देशांमध्ये चित्रपटांचे स्वागत झाले. पुण्यात येऊन आनंद झाल्याचे ते म्हणाले.

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८